
राबोडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in



जा.क. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ३६४ /२०२६ दि. ०९ /०९/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी, राबोडी वाहतुक उपविभागाचे हद्दीत दि.०५/०९/२०२६ रोजी **'गोपाळकाला'** सणानिमित्त दहिहंडी उत्सव मोठया प्रमाणांत साजरा करण्यात येत असतो. त्याकरीता मोठया स्वरूपात जनसमुदाय व दहिहंडी पथके सहभागी होत असतात. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	**१)** गोकुळनगर कडून मिनाताई ठाकरे चौक मार्गे कोलबाड नाका, खोपट सिग्नलकडे व उथळसर रोड, डॉ. आंबेडकर चौका कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **मिनाताई ठाकरे चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येते आहे.
पर्यायी मार्ग –	**अ)** सदरची वाहने ही गोकुळनगर, मिनाताई ठाकरे चौक, के व्हीला मार्गे इच्छित स्थळी वाहने जातील. **ब)** सदरची वाहने ही गोकुळनगर ब्रिजने जी.पी.ओ, खोपट मार्गे इच्छित स्थळी वाहने जातील.
प्रवेश बंद –	**२)** डॉ. आंबेडकर चौक, उथळसर नाका मार्गे मिनाताई ठाकरे चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **उथळसर नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येते आहे.
पर्यायी मार्ग –	**अ)** सदरची वाहने ही डॉ. आंबेडकर चौक, उथळसर नाका डावीकडे वळण घेऊन कोलबाड नाका मार्गे इच्छित स्थळी जातील. **ब)** सदरची वाहने ही डॉ. आंबेडकर चौक, उथळसर नाका उजवीकडे वळण घेऊन के व्हीला नाका मार्गे इच्छित स्थळी जातील. **क)** सदरची वाहने डॉ. आंबेडकर चौक येथुन डावी कडे वळण घेवुन खोपट मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दिनांक ०५/०९/२०२६ रोजी सकाळी ०८:०० वा. पासुन ते रात्रौ २४:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने यांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१/विशेष शाखा, ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे

परिवहन व्यवस्थापक, ठाणे/नवी मुंबई/बृन्मुबई महानगरपालिका

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे


प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.


दहिहंडी उत्सव = 9/5/2026
शारदा संकल्प प्रतिष्ठान
गोल्डन नाकाकडून मिनाताई ठाकरे चौकाकडे जाणारी वाहने प्रवेश बंद
पर्यायी मार्ग ब्रिज चढणी
मिनाताई ठाकरे चौक
दहिहंडी कार्यक्रम ठिकाण
कोलशेत नाका, खोपटकडे जाणारा रस्ता व ब्रिज
उथळसर नाका कोलशेत नाक्याकडे जाणारा रस्ता
कोविला कडे जाणारा ब्रिज रस्ता